(१)


# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, (दक्षिण कक्ष) बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३ / २७५७०१६६ / २७५७ ०३७० /
२७५७ १६७७, फॅक्स २७५७ ०९६१, २७५७ १६६६.


जा.क्र.मजीप्रा/सस/सभा-११३/८५

दिनांक :- ३०.५.२००९.

**विषय :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची ११३ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची ११३ वी बैठक दिनांक २६ मे-२००९ रोजी मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त या सोबत मंजूरीसाठी सादर करण्यांत येत आहे. कृपया त्यास मान्यता मिळावी, ही विनंती.

**सोबत :- इतिवृत्त.**

संजयदहासहस्त्र
( संजय दहासहस्त्र )
सदस्य सचिव

५१५-२२९६
२८।०८

मा. मंत्री,
पाणी पुरवठा व स्वच्छता
तथा अध्यक्ष, म.जी.प्रा.

Follow-up letters 4142 on 4.

संजयदहासहस्त्र
8-6-09

mhatre/३०५०९.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११३ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ११३ वी सभा मा. मंत्री, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २६/५/२००९ रोजी संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री.अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.

२. श्री. अजित कुमार जैन, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.

३. प्रधान सचिव, (वित्त व सुधारणा ) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने
   श्री.शि.म. म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

४. प्रधान सचिव, (उर्जा ) उद्योग उर्जा कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने
   श्री.दि.का.खरात, उप सचिव, (उर्जा) उर्जा विभाग मंत्रालय, मुंबई-३२

५. सचिव,ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने
   सौ.मा.प्र.कुलकर्णी, उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

६. श्री. संजय दहासहस्त्र, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

१. श्री.व्ही.आर. कल्याणकर, विशेष कार्य अधिकारी तथा मुख्य अभियंता,
   पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. श्री.हेमंत चं. लांडगे, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, नागपूर

३. श्री.प्र.वा.पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.

४. सौ.उषा प्र. महाजन, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.

५. श्री. बा.शि. पाटील, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

६. श्री.बी.के.सवाई, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.

मा.मंत्री, जलसंपदा, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.१ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११२ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक १३ जानेवारी, २००९ रोजी संपन्न झालेल्या ११२ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर, मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११२ व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक १३ जानेवारी, २००९ रोजी संपन्न झालेल्या ११२ व्या बैठकीत जे निर्णय घेण्यात आले होते, त्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. यानुषंगाने केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत..**

सदर कार्यक्रम बाबींमधील मुद्दांबाबत वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी बैठकीपुढे उहापोह केला. याबाबत चर्चा होऊन दि.११/१२/२००८ ते २०/५/२००९ या कालावधीत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे अल्प व दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात आली. तसेच मुदतपूर्व काढून घेण्यात आलेल्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात आली .

**कार्यक्रम बाब क्र.४ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००८-०९ चे सुधारित अंदाज व सन २००९-१० चे अर्थसंकल्पीय अंदाज.**

सदस्य सचिव यांनी मजीप्राचे सन २००८-०९ चे सुधारित अंदाज व सन २००९-१० चा अर्थसंकल्प अंदाज संचालक मंडळासमोर सादर केले. सदर अंदाजपत्रकामध्ये महसूलात रु.१६.८७ कोटींची तूट दिसते. सदर तूट सध्याचे कर्मचारी अधिकाऱ्यांचे Redeployment करुन तसेच जास्तीत जास्त नागरी व ग्रामीण पा.पु. योजना चालविण्यास घेऊन उत्पन्न वाढवून कमी करण्याचा प्रस्ताव असल्याचे मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व.विभाग यांनी स्पष्ट केले. अंतिमतः सादर केलेल्या कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.५ : वार्षिक लेखा सन २००७-०८ स्वीकृत करणेबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००७-०८ च्या वार्षिक लेख्यास मान्यता मिळण्याबाबतची सदरची कार्यक्रम सादर करण्यात आली. सदर बाबीबाबत वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी अवगत केले. सदस्य सचिव यांनी असेही स्पष्ट केले की, सन २००७-०८ या वर्षामध्ये रु.१८.५५ कोटींची तूट दिसून येते याचे प्रमुख कारण म्हणजे नवी मुंबई महानगरपालिकेला सन २००४ पासून विहीत पाणीपट्टी दराने केलेले आकारणीमध्ये रु.६०.५८ कोटी इतकी सुट दिल्याने तूट येते. मोरबे धरण नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतर केल्यांनतर त्यांच्याकडून केवळ पाणी पुरवठा केंद्र चालविण्यासाठी येणार खर्च वसूल करण्याचे ठरल्यामुळे पाणीपट्टी आकारणीमध्ये सुट देण्याचा निर्णय घेतल्याचे मा.प्रधान सचिव, पापु व स्ववि यांनी स्पष्ट केले. या वाटाघाटीमुळे १२० द.ल. लिटर क्षमतेचे न्हावाशेवा पा.पु.केंद्र मजीप्राकडेच ठेवण्यात यश मिळाले असून, त्याचा फायदा मजीप्रास झाला आहे. तेव्हा सदरची तुट भविष्यामध्ये भरुन काढणे शक्य होणार असल्याचे, मा.प्रधान सचिव, पा.पु.व स्व.वि. यांनी स्पष्ट केले. अंतीमतः सन २००७-०८ चे लेखे स्वीकृत करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.६ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या न्हावाशेवा प्रकल्प क्षेत्र व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या दराचा सन २००९-१० आढावा.**

मजीप्राच्या मालकीच्या न्हावाशेवा प्रकल्प क्षेत्र व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या दराचा सन २००९-१० या वर्षाचा आढावा घेण्यात आला असून, सन २००९-१० मध्ये सध्याचेच दर चालू ठेवल्यास मजीप्रास रु.२२ कोटींचे आधिक्य मिळणार आहे. त्यामुळे पाणी दर वाढ प्रस्तावित न करण्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास सांगितले. मा.अध्यक्षांनी असे सूचीत केले की, इतर विभागाकडून पाण्याचे दर किती आकारले जाते याची माहिती घ्यावी व नवी मुंबई परिसरात जे मोठे ग्राहक आहेत त्यांच्या दरामध्ये वाढ करण्याची शक्यता तपासावी. यावर सदस्य सचिव यांनी असे नमूद केले की, या परिसरात MIDC , CIDCO व नवी मुंबई महानगरपालिकेचे दर मजीप्राच्या दरांपेक्षा जास्त आहे. परंतु मजीप्राचा Business कमी होऊ नये या उद्देशाने जेथे MIDC , CIDCO व नवी मुंबई महानगरपालिकेचे दर जास्त आहे अशा ठिकाणी मजीप्राच्या सध्याच्या दरात थोडी

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

वाढ करुन MIDC , CIDCO व नवी मुंबई महानगरपालिका यांच्यापेक्षा रु.२ प्रती १००० लि. इतके दर कमी ठेवून सुधारित दर लागु करण्यात येईल. मजीप्रा सध्याचे दर रु.१४.६० इतके असून, एमआयडीसी ही संस्था त्यांच्या ग्राहकांना रु.१८.०० इतके आकारते असे सूचीत केले. जे.एन.पी.टी. या संस्थेला रु.१४.६० वरुन रु.१६.०० इतका दर आकाराबा असे करतांना मजीप्राचे ग्राहक इतर संस्थेकडे जाणार नाहीत याची काळजी घ्यावी असे मा.अध्यक्षांनी निर्देश दिले. उर्वरित दर वाढू नये असे सर्वानुमते ठरले. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.७ : अंबरनाथ पाणी पुरवठा केंद्राच्या ठिकाणाचे पाण्याचे दर पाणी वापरानुसार आकारणेबाबत (Telescopic Tariff).**

अंबरनाथ पाणी पुरवठा केंद्रातर्गंत, ग्राहकांना आकाराबयाचे दर पाणी वापरानुसार आकारण्याबाबतचा (Telescopic Tariff) सदरचा प्रस्ताव असून या प्रस्तावानुसार ज्या नळ धारकाचा पाण्याचा वापर २५ घनमीटर पेक्षा जास्त आहे अशा घरगुती ग्राहकांना सध्याच्या दराच्या दिडपट दराने पाणीपट्टी आकारावयाचे प्रस्तावित असल्याचे सदस्य सचिव यांनी सदर प्रस्ताव अंमलात आणल्यास ग्राहकाकडून अनावश्यक पाणी वापर टळण्यात येऊन त्यानुसार उपलब्ध होणारे जादा पाणी इतर ग्राहकांना पुरेशा व आवश्यक प्रमाणात पाणी पुरवठा होण्यास मदत होणार असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. इतर पाणी पुरवठा केंद्रांचादेखील आढावा घेऊन प्रस्ताव तयार करण्याबाबत मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांनी सुचविले. असा आढावा घ्यावा परंतु सुधारित दर योग्य वेळी लागू करण्याबाबत मा.अध्यक्षांनी सुचना केल्या. यावर मा.प्रधान सचिव यांनी असे स्पष्ट केले की, असा आढावा घेण्यास २ ते ३ महिन्याचा कालावधी लागेल त्यानंतरच सुधारित दर लागू केले जातील. मा.प्रधान सचिव यांनी केलेल्या प्रस्तावास मा.अध्यक्षांनी संमती दर्शवून पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.८ : मानोरा व २८ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता.मानोरा, जि.वाशिम योजनेचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करणेबाबत.**

उपरोक्त योजना मजीप्रामार्फत राबविण्यात येऊन यशस्वीरित्या चाचणी देऊन सप्टेंबर-२००५ पर्यंत नागरिकांना पाणी पुरवठा करण्यात आला होता. चाचणी कालावधीत मजीप्रामार्फत देखभाल व दुरुस्ती केल्यानंतर जिल्हा परिषदेकडून हस्तांतरीत करुन घेण्यास प्रतिसाद न मिळाल्याने सद्यस्थितीत योजना बंद आहे. त्यामुळे सदर योजना मजीप्रामार्फत थेट ग्राहकांपर्यंत, मजीप्राकडील अतिरिक्त कर्मचारी वापरुन राबविण्याचा सदरचा प्रस्ताव असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर योजना मजीप्राने चालविल्यास पहिल्या तीन वर्षात तूट अपेक्षित आहे व त्यानंतर योजना नफ्यात चालेल असे सदस्य सचिव यांनी सांगितले.

सदर योजना मजीप्राने चालविल्यामुळे पहिल्या तीन वर्षात जी आर्थिक तूट येईल त्यासाठी शासनाकडून प्रोत्साहन अनुदान स्वरुपात आर्थिक सहाय्य घेण्यासाठीही प्रस्तावित करण्यात येत असल्याचे तसेच ग्राहकांना परवडणाऱ्या दराने पाणीपट्टी आकारुन कंत्राटदारामार्फत किंवा कंत्राटदाराशिवाय चालविण्याचे प्रस्तावित असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. अपेक्षित तूट भरुन काढण्यासाठी शासनाकडे वेळोवेळी निधीची मागणी करण्यात यावी असेही ठरले.

सदर बाबीवर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावित केल्यानुसार सदर योजना मजीप्रामार्फत राबविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येऊन या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.९ : कुळगांव-बदलापूर येथील प्रगती अंध विद्यालय या सेवाभावी संस्थेस सवलतीच्या दराने पाणीपट्टी आकारणेबाबत.**

कुळगांव-बदलापूर येथील प्रगती अंध विद्यालय या सेवाभावी संस्थेस सवलंतीच्या दराने पाणीपट्टी आकारण्याचा सदरचा प्रस्ताव असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्याचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **मा. अध्यक्ष तथा** | **सदस्य सचिव** |
| **मंत्री, पा.पु. व स्व.** | **म.जी.प्रा.** |

१) थकबाकी पोटी खंडीत केलेल्या जोडण्यांची पाणी देयके पूर्वलक्ष प्रभावाने म्हणजेच मंजूरीच्या दिनांकापासून (५/९६) घरगुती दराने सुधारित करणे.

२) विशेष बाब म्हणून निर्भय योजनेचा लाभ देऊन ग्राहकांने ४/०८ मध्ये भरलेली रक्कम मूळ मुद्दलापोटी समायोजित करुन १००% विलंब आकार माफ करणे.

३) सदर ग्राहकांने, वाढीव सवलत म्हणून घरगुती दराच्या ५०% दराने पाण्याची आकारणी करणे व ती पूर्वलक्षी प्रभावाने करणे अशी मागणी केली आहे.

सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावित केल्यानुसार फक्त मुद्या क्र.२ ला मान्यता प्रदान करण्यात येऊन मुद्या क्र.१ व ३ अमान्य करण्यांत आला व याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.१०: पुर्वीची महाबळेश्वर नळ पाणी पुरवठा योजना, जि.सातारा नगरपालिकेकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करुन घेण्याबाबत.**

मजीप्राचे पाणी पुरवठा केंद्र म्हणून जून-०४ पर्यंत मजीप्रामार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येत असलेली व सध्या महाबळेश्वर नगरपरिषदेमार्फत चालविण्यात येत असलेली पा.पु.यो. पुनश्चः मजीप्राने अस्तित्वातील १३ कर्मचाऱ्यांसह हस्तांतरीत करुन घेऊन मजीप्रामार्फत चालविण्याबाबतचा सदर प्रस्ताव असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन सदर पाणी पुरवठा केंद्र विहित पध्दतीचा अवलंब करुन हस्तांतरीत करुन घेण्यास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली असून पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

बैठकीसमोर अन्य विषय नसल्याने, उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

स्वाक्षरीत/-
**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**